# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

प्रेसनोट

## काञज चौकातील उड्डाणपुलाच्या कामामुळे पीएमपीएमएल च्या बस स्थानकांतील बदलाबाबत

रहदारीच्या दृष्टीने महत्वाचा असणाऱ्या शहरातील कात्रज चौकामध्ये उड्डाणपुलाचे काम सुरू असून कात्रज मुख्य चौकामध्ये उड्डाणपुलाचे सेगमेंट लिफ्ट करणे व अलायमेंट करणेसाठी कात्रज येथे असणाऱ्या पीएमपीएमएल च्या बसस्थानकांमध्ये तात्पुरत्या स्वरूपात बदल करणेबाबत मा. पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा, पुणे शहर यांनी पीएमपीएमएल प्रशासनास सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार दि. ०२/१२/२०२४ रोजी रात्रौ १२.०० वा. पासून पीएमपीएमएल च्या बस वाहतूकीमध्ये व बसस्थानकांमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

१) **कात्रज-कोंढवा रोड बस स्थानकः-** कात्रज-कोंढवा रोड बस स्थानकावरून सुटणारे बस मार्ग क्र. १४०अ, १८८, २०९, २९१, के-१६ व एपी-२ या मार्गाच्या सर्व बसेस **राजस सोसायटी चौकातून** संचलनात राहतील.

२) **कात्रज बायपास बस स्थानकः-** कात्रज बायपास बस स्थानकावरून सुटणारे बसमार्ग क्र. ४३, ४३अ, ४४, ४५, २१४ व २२८ या मार्गाच्या सर्व बसेस **वंडर सिटी समोरील सर्व्हिस रोड** येथून संचलनात राहतील.

३) **कात्रज सर्पोद्यान बस स्थानकः-** कात्रज सर्पोद्यान बस स्थानकावरून सुटणारे बसमार्ग क्र. ६१, २९२, २९३, २९६ व २९६अ या मार्गाच्या सर्व बसेस **गुजरवाडी बस स्थानक** येथून संचलनात राहतील.

४) **कात्रज पोलीस चौकी बस स्थानकः-** कात्रज पोलीस चौकी बस स्थानकावरून सुटणारे बसमार्ग क्र. २४, २४अ व २३५ या मार्गांवरील **कात्रज डेपोच्या बसेस कात्रज सर्पोद्यान बस स्थानकातून** सुटतील व बसमार्ग क्र. २४अ व २३६ या मार्गांवरील **वाघोली डेपोच्या बसेस स्वारगेट मुख्य बस स्थानकातून** सुटतील. तसेच बसमार्ग क्र. १३०, २९०, के-११, के-१२, के-१४ व के-१८ या मार्गांवरील बसेस कात्रज पोलीस चौकी बस स्थानकांतून संचलनात राहतील.

५) **कात्रज रोड बस स्थानकः-** कात्रज रोड बस स्थानकावरून सुटणारे बसमार्ग क्र. २अ, ११क, ३०१, ३०१अ, रातराणी बसेस **कात्रज डेपोतून** संचलनात राहतील.

६) **गुजरवाडी-कात्रज बस स्थानकः-** गुजरवाडी-कात्रज बस स्थानकावरून सुटणारे बसमार्ग क्र. ४२, ९०, १०३, १०३म, २९८, २९९ व ३३९ या मार्गाच्या सर्व बसेस **कात्रज दूध डेअरी जवळ असणाऱ्या कचरा डेपोपासून** संचलनात राहतील.

७) बसमार्ग क्र. २९४, २९५ व २९७ हे उड्डाणपुलाच्या कामामुळे तूर्तास बंद ठेवण्यात येणार आहेत.

८) बसमार्ग क्र. ४७, ५२ व ५२अ या मार्गाच्या सर्व बसेस जुन्या सारसबाग बसस्थानकातून संचलनात राहतील.

तरी पीएमपीएमएल कडून करण्यात आलेल्या उपरोक्त बदलांबाबतची नोंद प्रवासी नागरीक, विद्यार्थी, कामगार व महिला वर्ग यांनी घेवून परिवहन महामंडळास सहकार्य करावे, असे आवाहन पीएमपीएमएल प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

Sd/-

चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

दि. ३०/११/२०२४

मा. संपादक,

दैनिक ..........

यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे. मा. स. कळावे.

Sd/-

**कामगार व जनता संपर्क अधिकारी**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---